P/X/१/२०१८ (Review)

# राजाराम माने, प्रशासकीय सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण पुणे खंडपीठ पुणे यांचेसमोरील कामकाज.

---------

P/X/१/२०१८ (Review)

१) श्री. अशोक वसंतराव काळभोर )
रा. फ्लॅट नं. अ-७/२०, गंगा व्हिलेन, हांडेवाडी ) अर्जदार
पुणे ४११ ०२८ )
२) श्री. भालचंद्र मधुकर काळभोर )
रा. शिवलिला अपार्टमेंट, फ्लॅट नं. ५ बालाजीनगर)
धनकवडी, पुणे ४३ )
स्वत:साठी व कै. मधुकर यांचे कुटुंबाचा कर्ता म्हणून)
३) श्रीमती शिला भास्कर काळभोर )
४) श्री. हिंमतराव भास्कर काळभोर )
दोघे रा. सी-५/२७, प्लेझंट पार्क नं. १ वानवडी )
पुणे ४११ ०१३ )

विरुध्द

१) श्रीमती फुलाबाई दत्तात्रय काळभोर ) जाब देणार
२) श्री. ज्ञानेश्वर दत्तात्रय काळभोर )
३) श्री. दिलीप दत्तात्रय काळभोर )
४) श्री. सुभाष दत्तात्रय काळभोर )
**५) ईदुबाई शामराव काळभोर (मयत वारस)** )
**अ) विठ्ठल शामराव काळभोर (म.वा.)** )
१) पुष्पा विठ्ठल काळभोर (पत्नी) )
२) विशाल विठ्ठल काळभोर (मुलगा) )
३) तुषार विठ्ठल काळभोर (मुलगा) )
**ब) राजेंद्र शामराव काळभोर (म.वा.)** )
१) सीमा राजेंद्र काळभोर (पत्नी) )
सर्व रा. सिद्राममळा, जुन्या कॅनॉलजवळ, )
लोणी काळभोर, ता. हवेली, जिल्हा पुणे )
६) सौ. सुशिला विश्वनाथ पोकळे )
७) श्रीमती पुष्पा विठ्ठल काळभोर )
८) सीमा राजु काळभोर )
९) श्री. सुधीर देवराम काळभोर )
१०) श्री. संभाजी देवराम काळभोर )
नं. १ ते १० रा. मु. पो. लोणी काळभोर, सिद्राम )
मळा, जुन्या कॅनॉलजवळ, ता. हवेली, जि. पुणे )
११) सरपंच, ग्रामपंचायत कदमवाकवस्ती तर्फे )
[illegible] महादेव राऊत )
लोणी काळभोर, सोलापूर रोड, मु.पो. लोणी )

काळभोर, तालुका हवेली, जि. पुणे )
१२) श्रीमती कल्पना भालचंद्र कुंजीर )
रा. ६१८ सोपाननगर, हुडको कॉलनी, सासवड )
तालुका पुरंदर, जिल्हा पुणे )
१३) सौ. जयश्री सुधीर देशमुख )
रा. फिलाडेल्फिया अमेरिका, )
पुण्यातील पत्ता - ८/१२ प्लेझंट पार्क नं. १ )
वानवडी, पुणे ४११ १३ )
१४) उर्मिला अरविंद सुर्यवंशी )
रा. बंगला नं. ३६, वसंत कॉलनी, सांगली मिरज )
रोड, तालुका सांगली, जिल्हा सांगली )

## न्यायनिर्णय

प्रस्तुतचा पुनर्विलोकन अर्ज या न्यायाधिकरणाकडील आदेश क्रमांक टेनन्सी/रिव्हीजन/पी/II/९/२०१८ दिनांक २५/७/२०१८ च्या आदेशावर नाराज होऊन दाखल केलेला आहे. सदर अर्जाची प्रथम सुनावणी दिनांक २२/११/२०१८ रोजी सुरु झाली त्यामध्ये वारंवार पुढील तारखा देण्यात आलेल्या होत्या. दिनांक २७/१०/२०२१ रोजी जाब देणार यांचे वकीलांना दिनांक १६/१२/२०२१ रोजी लेखी युक्तिवाद सादर करण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर दिनांक २२/२/२०२२ रोजी सदरचा अर्ज पुनर्विलोकन अर्ज असल्यामुळे खालील न्यायालयांच्या कागदपत्रांची वाट न पाहता लेखी म्हणणे दाखल करण्यासाठी दिनांक ३०/३/२०२२ ही अंतिम तारीख देण्यात आलेली होती. त्यानुसार दोन्ही पक्षकारांनी लेखी युक्तिवाद सादर केले.

प्रकरणाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे आहे. प्रस्तुत प्रकरणातील जाब देणार १२, १३ व १४ यांनी तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण हवेली यांचेकडे कलम ३२ग अंतर्गत दाखल केलेल्या प्रकरणी दिनांक २२/९/१९६९ रोजी आदेश पारित केले होते. सदर आदेशानुसार जाब देणार नंबर १ ते १० चे पूर्वाधिकारी गुलाबराव मुकुंदराव काळभोर हे कृषकदिनी म्हणजेच दिनांक १/४/१९५७ रोजी कुळ असल्याचे ठरवून कलम ३२ ग अन्वये खरेदीची किंमत निश्चित केली होती. मूळ जमीनमालक सध्याचे अर्जदार यांचे पूर्वाधिकारी वसंतराव गंगोजीराव काळभोर हे होते. तहसिलदार यांचे आदेशाविरुध्द अंदाजे

४४ वर्षांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील क्रमांक ११/२०१३ दाखल केले होते. उपविभागीय अधिकारी यांनी विलंब माफीचा अर्ज फेटाळलेला आहे. या न्यायाधिकरणाने उपविभागीय अधिकारी यांचे निर्णयावरील पुर्नर्निरीक्षण अर्ज दाखल करुन घेता येणार नाही या मुद्यावर फेटाळलेला आहे. त्यामध्ये त्यांनी दिनांक २२/९/१९६९ चा आदेश योग्य असल्याचे नमूद केले आहे. जाब देणार व अर्जदार यांचे पूर्वाधिकारी यांचेमधील चुलतभाऊ या नात्याचा विस्तृत ऊहापोह केलेला आहे. जमीनमालक व कुळ हे नाते योग्य असल्याबाबत निष्कर्ष दिलेला आहे. सदरचा आदेश जमीनमालक वसंतराव यांनी त्यांचे हयातीत आव्हानित केलेला नाही त्यामुळे वसंतराव यांचे वारसांनी ४४ वर्षाचे दीर्घ विलंबाने अपील करणे योग्य ठरत नसल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी काढलेले निष्कर्ष योग्य असल्याचे नमूद केले आहे.

पुर्नविलोकन अर्जकामी अर्जदार यांनी लेखी युक्तिवाद सादर केला आहे. त्यामध्ये अर्जदार व जाब देणार क्रमांक १ ते १०, १२ ते १४ एकाच कुटुंबातील आहेत व त्यांचे नातेसंबंध असल्याचे नमूद केले आहे व त्यामुळे त्यांचेमध्ये मालक व कुळ असे नाते अस्तित्वात येऊ शकत नाही असे त्यांनी युक्तिवादामध्ये नमूद केले आहे.

जाब देणार यांनी त्यांचे युक्तिवादामध्ये अर्जदार यांचे विधान अमान्य असलेचे नमूद केले आहे. गेली ७० ते ८० वर्षापासून त्यांचा कधीही ताबा नाही. वाद मिळकतीशी त्यांचा कोणताही हक्क व संबंध नाही. अर्जदार यांनी सादर केलेल्या वंशवेलीबाबत कोणताही कायदेशीर पुरावा सादर केलेला नाही. सदर मिळकतीचा जाब देणार क्रमांक १२ व १४ यांचा काहीही संबंध नाही. वाद मिळकतीमध्ये कै. गुलाबराव काळभोर यांची पूर्वीपासून वहिवाट होती. त्याप्रमाणे ७/१२ रेकॉर्डला नोंद होती. त्यामुळे त्यांनी कुळकायदा कलम ३२ग प्रमाणे खरेदीची किंमत ठरवून ती त्यांनी भरुन कलम ३२एम चे सर्टिफिकेट मिळालेले आहे. दिनांक २२/९/१९६९ रोजी झालेले कलम ३२ग चे आदेश कोणत्याही न्यायालयांत अपील केले नव्हते त्यामुळे अर्जदार यांचा पुर्नविलोकन अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

खालील कोर्टाची कागदपत्रे, पुनर्विलोकन अर्जदार व जाब देणार यांचा लेखी युक्तिवाद विचारांत घेता, पुनर्विलोकन अर्जदार यांनी जमीन मालक व कुळ हे एकाच कुटुंबातील असल्याचे नमूद केले आहे. परंतू याबाबतीत वसंतराव यांनी त्यांच्या हयातीत हा मुद्दा कधीही आव्हानित केलेला नाही. याशिवाय मूळ मुद्दा कलम ३२ग चा आदेश दिनांक २२/९/१९६९ रोजी झालेला असल्याने तो गेली सुमारे ४४ वर्षे जमीन मालक व कुळ यांना मान्य होता. तो त्यांच्या हयातीत त्यांनी कधीही आव्हानित केलेला नाही. त्यामुळे एवढया दीर्घ विलंबानंतर उपविभागीय अधिकारी यांचेकडे झालेले अपील त्यांनी फेटाळुन लावलेले आहे ते मुदतबंधनाच्या कायद्यानुसार योग्य आहे. उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयास अनुसरुन या न्यायालयाने पुनर्निरीक्षण अर्ज काढून टाकलेला आहे त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. तसेच पुनर्विलोकन अर्जदार यांनी अशी कोणतीही बाब समोर आणलेली नाही की ज्यामुळे उपविभागीय अधिकारी यांनी अपिलात दिलेल्या व या न्यायाधिकरणाने पुनर्निरीक्षण अर्जामध्ये दिलेल्या निर्णयामध्ये फेरबदल करण्याचे कारण दिसून येईल. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) पुनर्विलोकन अर्ज काढून टाकण्यात येत आहे.

२) सदर निकालाची समज उभय पक्षकारांना देण्यात यावी.

३) खालील कोर्टाचे अभिलेख संबंधितांना परत करण्यात यावेत.

कौन्सिल हॉल, पुणे १
दिनांक : ०१/०४/२०२२

**( राजाराम माने )**
**प्रशासकीय सदस्य**
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण,**
**खंडपीठ पुणे.**